# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २००६ मध्ये सुधारणा**

विद्युत अधिनियम, २००३

क्र. मविनिआ/लिगल/११६/६३१ विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) मधील कलम ४२ च्या उप-कलम (५) ते (७) सह कलम १८१ च्या उप-कलम (आर) आणि (एस), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २००६ मधील विनियम २७ ने प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच या संदर्भात समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( आयोग) याद्वारे, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २००६ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे विनियम करीत आहेः-

१ (१) या विनियमांना “महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) (सुधारणा) विनियम, २००७”, असे म्हणावे.

(२) हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२ महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २००६ मध्ये

(१) विनियम ४.१ मधील उप-विनियम (३ ) ऐवजी खालील उप-विनियम दाखल करण्यात येईलः-

“ (३ ) एक सदस्य हा आयोगातर्फे नामनिर्देशित करण्यात येईल व तो ग्राहकांच्या गा-हाणे निवारण्यासाठी शक्य तो कमीत कमी पाच (५ ) वर्षे

त्या विभागात कार्यरत असलेल्या एखाद्या नोंदणीकृत स्वयंसेवी ग्राहक संरक्षण संस्थेचा प्रतिनिधी असेल.”

२. विनियम ४.३ ऐवजी खालील विनियम दाखल करण्यात येईलः-

“४.३ मंचाचा प्रत्येक सदस्य हा ठराविक तीन वर्षांसाठी पद धारण करेल. परंतु असे की, त्याची मुदत एकूण सदुसष्ट (६७) वर्षाच्या वयोमर्यादेस अधीन राहून आणखी दोन (२) वर्षाहून अधिक नसेल इतक्या कालावधीपर्यंत वितरण परवानाधारक वाढवू शकेल किंवा विनियम ४.१ (३) मध्ये संबोधित केलेल्या सदस्याच्या बाबतीत आयोग वाढवू शकेल. ”

सही/-

(मालिनी शंकर)

सचिव, मविनिआ

मुंबई,

२ एप्रिल, २००७